झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

जा.क्र.झो.पु.प्रा./सहनिस/परिपत्रक-भाडे/कार्यासन-१/टे.सी./सन २०१५/४६८५
सहकार कक्ष.झो.पु.प्रा.मुंबई
दिनांक :- १८ /१२/२०१५

परिपत्रक क्र. १६६

विषय : विकासकामार्फत पात्र झोपडीधारक यांना भाडेअदा करणेसाठी ॲक्सीस बँकेत (Axis Bank) विशेष खाते (Special Account) उघडण्याबाबत.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे स्विकृत केलेल्या योजनेच्या भूखंडावरील झोपडीधारक विकास कामासाठी आपले झोपडे रिक्त करुन देणा-या झोपडीधारकास पर्यायी व्यवस्था म्हणून संक्रमण शिबीरात जागा उपलब्ध न झाल्यास त्यास पर्यायी जागेचे भाडे देण्याची विकासकाकडून व्यवस्था करण्यांत येते व पर्यायी जागेचे भाडे विकासकाकडून अदा करण्यांत येते.

त्याअनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडील परिपत्रक क्र. १५३ दिनांक ०६.०६.२०१५ (सदर परिपत्रक www.sra.gov.in. या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.) अन्वये संस्थेच्या सभासदांना थकीत व आजपर्यंतचे भाडे अदा करण्यासाठी कोणत्याही बँकेत स्वतंत्र खाते उघडावे व सदर खात्यावर सभासदांच्या थकीत भाड्याची रक्कम तात्काळ जमा करुन याबाबतचे स्व:घोषणापत्र (Self Declaration) या कार्यालयात सादर करण्यांत येते असे नमूद करण्यांत आलेले आहे.

असे निदर्शनास आले कि, विकासक यांनी भाडयासाठी उघडलेले बँक खाते अनेक बँकात असते. त्यामुळे भाडयाबाबतची माहिती एकत्र करण्यास व त्यावर नियंत्रण ठेवणेस अडचणी येतात. त्यामुळे सदरील कामकाजात सु-सूत्रता आणण्यासाठी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहेत. -

१. प्रत्येक योजनेसाठी योजनेचे विकासक यांनी ॲक्सीस बँकचे (Axis Bank) वरळी शाखेमध्ये शुन्य टेव विशेष खाते (Zero Balance Special Account) उघडावे.
२. परिपत्रक क्र. १५३ प्रमाणे देय असलेली झोपडीधारकांचे भाडे देय दिनांकाच्या ०३ दिवसापुर्वी सदरील खात्यावर रक्कम जमा करावी.

प्रशासकिय इमारत, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पु), मुंबई - ४०००५१
दुरध्वनी क्र.२६५६५८००/२६५९०४०५/३८७९ फॅक्स क्र.९१-२२-२६५९०४५७संकेतस्थळ:www.sra.gov.in ई-मेल:info@sra.gov.in

३. ॲक्सीस बँकेने (Axis Bank) झोपडीधारकाच्या खात्यावर त्यांचे भाडयाची देय रक्कम R.T.G.S. मार्फत भाडे देय असलेल्या दिनांकास हस्तांतरीत करावी.

४. सक्तीच्या कारवाईने (महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुर्नविकास) अधिनियम १९७१ तसेच विकास नियंत्रण नियमावली १९९१ चे कलम ३३/३८, ३३ (अ))कोणत्याही पात्र झोपडीधारकाची झोपडी तोडण्यापुर्वी सदरील योजनेत इतर पात्र सभासदांना ज्या दराने भाडे दिले आहे त्या दराने ११ महिन्याचे भाडे सदरील विशेष खातेवर (Special Account) जमा करावे व याबाबत स्वःघोषणापत्र (Self Declaration ) सहकार विभागास विकासकानी दयावे.

५. वरीलप्रमाणे भाडयाची रक्कम बँकेत जमा करण्यांत आल्याची माहिती सक्षम प्राधिकारी यांनी निष्कासनाची (Eviction) नोटीस मध्ये नमूद करावी व झोपडीधारकास त्यांचा बँक खातेक्रमांक देणेबाबत पत्र दयावे व बँक खात्याची माहिती प्राप्त झाल्यानंतर विकासकामार्फत ही माहिती बँकेत सादर करावी व बँकेनी त्या खात्यावर सदरील रक्कम हस्तांतरीत करण्याची कार्यवाही करावी.

६. ॲक्सीस बँकेने (Axis Bank) दर महिन्याच्या ०५ तारखेला या संदर्भातील खात्यावर झालेल्या व्यवहाराचा अहवाल सादर करावा.

७. सध्या ज्या ज्या योजनाना (Scheme) मध्ये झोपडीधारक भाडयावर (Rent) आहेत त्या सर्व योजनाबद्दल वरीलप्रमाणे विशेष खाते (Special Account) १५ जानेवारीपर्यंत उघडण्यांत यावे आणि झोपडीधारकाची माहिती ॲक्सीस (Axis) बँकेला सादर करण्यांत यावी. ज्या योजनाबद्दल (Scheme) विशेष खाते (Special Account) उघडण्यांत येणार नाही त्या योजनेला (Scheme) खाते उघडण्यापर्यंत विक्री घटकाला (Sale Component) स्थगिती देण्यांत यावी. ज्या योजनामध्ये (Scheme) कुणीही झोपडीधारक भाडयावर ( Rent)नसतील त्यासाठी विकासकाचे स्वःघोषणापत्र (Self Declaration) पुरेसा असेल व विशेष खाते (Special Account) उघडावयाची आवश्यकता असणार नाही. परंतु स्वःघोषणापत्र (Self Declaration ) १५ जानेवारी पर्यंत देणे बंधनकारक आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई

---

प्रशासकिय इमारत, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पु), मुंबई - ४०००५१

दुरध्वनी क्र.२६५६५८००/२६५९०४०५/१८७९ फॅक्स क्र.९१-२२-२६५९०४५७संकेतस्थळ:www.sra.gov.in ई-मेल:info@sra.gov.in